लोकमत

# फिनोलेक्स व मुकुल माधव फाउंडेशनकडून मदत
# 'ससुन' रुग्णालयाला दोन कोटी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि त्यांचे 'सीएसआर' भागीदार मुकुल माधव फाउंडेशन यांच्याकडून ससून सर्वोपचार रुग्णालयाला दोन कोटी रुपयांच्या अर्थसाहाय्यातून अत्याधुनिक उपकरणे देण्यात आली. येत्या १६ एप्रिलला नवजात शिशू अतिदक्षता विभागाच्या (एनआयसीयू) दुसऱ्या, तर एंडोस्कोपी युनिटच्या पहिल्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने या अद्ययावत यंत्रणेचे औपचारिक उद्घाटन होणार आहे.

एंडोस्कोपी युनिट आणि एनआयसीयू या विभागात ही अद्ययावत यंत्रणा बसविण्यात येत आहे. समविचारी लोकांच्या मदतीने फाउंडेशनतर्फे १० लाख रुपयांच्या निधीतून आधुनिक लेसर मशीनद्वारे दंतरोपण सुविधा दिली आहे. अशा प्रकारचे दंतचिकित्सा करणारे हे पहिलेच शासकीय रुग्णालय आहे. फिनोलेक्स, मुकुल माधव फाउंडेशन २०१२ पासून ससून रुग्णालयांशी जोडले गेले असून, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील गरजू मुलांना अर्थसहाय्य केले जात आहे. ससून रुग्णालयाचे माजी अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले म्हणाले, "पहिल्यांदाच शासकीय रुग्णालय आणि उद्योगसमूह यांच्या संयुक्त प्रयत्नातून चांगला उपक्रम सुरु झाला. आज ससून रुग्णालयाला समाजाकडून अर्थसहाय मिळत आहे.



केवळ उपक्रमांना अर्थसहाय्य देऊन आम्हाला थांबायचे नाही. पैसे दिले आणि आमची जबाबदारी संपली अशा स्वरुपात आम्ही काम करत नाही. समाजाला चांगल्या आरोग्य सुविधा अल्पदरात उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रयत्नशील आहोत. आमच्याकडे असलेल्या यंत्रणेमार्फत समाजाच्या नेमक्या गरजा ओळखून त्यानुसार त्यावर काम करीत आहोत. एनआयसीयूमुळे गेल्या दोन वर्षात ५२०० बाळांना जीवदान दिल्याचा, तर एंडोस्कोपीमार्फत केवळ ३५० ते ११५० रुपयांत उपचार देण्यात यश आले, याचा आनंद आहे.

**- रितू प्रकाश छाब्रिया, माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त**